# शिक्षण आणि प्रसारमाध्यमे




– संपादक –

डॉ. ए. आर. राणे
डॉ. केतन चौधरी
डॉ. निलेश जोशी
प्रा. संदीप केदार





# शिक्षण आणि प्रसारमाध्यमे

– संपादक –
डॉ. ए. आर. राणे
डॉ. केतन चौधरी
डॉ. निलेश जोशी
प्रा. संदीप केदार

अथर्व पब्लिकेशन्स

अथर्व पब्लिकेशन्स

**शिक्षण आणि प्रसारमाध्यमे**
(Shikshan Aani Prasarmadhyame)

© सुरक्षित

ISBN : 978-81-19118-12-0
पुस्तक प्रकाशन क्र. ११३५

**प्रकाशक व मुद्रक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** मार्च २०२०
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** २५०/-

**E-Book *available on***
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

**ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

# Editors Desk

Khandesh College Education Society is established in the 1944. The society are running various Educational institutions. Khandesh College Education Society was only possible with zealous and ardent efforts of Late Dr. G.D. Bendale. Under the Global Visionary Management of Khandesh College Education Society, Jalgon, the KCES College of Education & Physical Education has started its beginning of training the teachers for tomorrow from the year 1965. The college is recognized by the Government and recognized under section 2(f) and section 12 B of the UGC act.

The National level seminar was organised with the assistance of the Mass and Communication Department of the MJ College, Jalgaon. MJ College also an iconic institution of KCE Society.

On the occasion of the seminar, I would like to express my deepest gratitude and appreciation to everyone who made the seminar on Social Media and Education a resounding success. This event would not have been possible without the collective efforts and support of numerous individuals and organizations.

First and foremost, I would like to thank our esteemed speakers who generously shared their insights and expertise in the field of social media and education. Their presentations were thought-provoking and inspiring, providing us with valuable knowledge and perspectives.

I would also like to extend my gratitude to all the participants who attended the seminar. Your active engagement and enthusiastic participation enriched the discussions and created a vibrant learning environment. The diverse perspectives and experiences shared during the interactive sessions contributed greatly to the overall success of the event.

Furthermore, I would like to acknowledge the hard work and dedication of the organizing committee members. Their meticulous planning, attention to detail, and tireless efforts ensured that every aspect of the seminar was well-coordinated and executed

flawlessly. Your commitment to excellence is truly commendable.

Lastly, I would like to express my gratitude to the venue staff, technical support team, and all the volunteers who worked behind the scenes to make this seminar a success.

In conclusion, I would like to express my heartfelt appreciation to everyone involved in making the seminar on Social Media and Education a memorable and impactful event. Your contributions, whether big or small, have left a lasting impression on all the attendees. Together, we have taken a step forward in harnessing the power of social media to transform education for the better.

Thank you once again for your unwavering support and dedication.

# अनुक्रमणिका

१. **दूरस्थ शिक्षणात प्रसारमाध्यमांची भूमिका................... ७**
*– किसन सुभाष पावरा*

२. **स्त्री शक्ती................................................ ११**
*– प्रियंका सुरेंद्रकुमार अहिरे*

३. **सोशल मीडिया आणि तरुणाई .............................. १७**
*– डॉ. स्वाती वसंतराव चव्हाण*

४. **सोशल मीडियाचे लहान मुले आणि**
**किशोरावस्थेतील मुलांवर होणारे परिणाम .................. २३**
*– दीपक श्रीराम दलाल*

५. **माहिती अधिकार कायद्याचा पत्रकारितेत**
**वस्तुस्थिती तपासण्याचे साधन म्हणून होणारा वापर ........ २८**
*– पूजा पवार*

६. **लुप्त होणाऱ्या पारंपरिक खेळांची माहिती व फायदे ........ ३३**
*– आकाश धुमाळ*

७. **सामाजिक विकासात समूह संपर्क साधनांचा**
**होणारा परिणाम ............................................ ३५**
*– खुशबू राजेंद्र इंगळे, केतन पोपट चौधरी*

८. **जळगाव पीपल्स बँकेतील बचत गटाच्या**
**माध्यमातून महिला सशक्तीकरण एक अभ्यास ............... ४४**
*– पल्लवी गोपाळ भांडारकर*

९. **खेळात माध्यमांचे महत्त्व.................................. ४९**
*– प्रा. प्रवीण दामोदर कोल्हे*

१०. **माहिती युगातील जनसंपर्क.................................. ५६**
*– डॉ. गणेश अ. पाटील*

११. **महिला आणि प्रसारमाध्यमे : एक अभ्यास .................. ६०**
*– डॉ. वंदना सतीश चौधरी*

१२. **मराठी क्रीडा पत्रकारितेचे जनक विष्णू विनायक**
**करमरकर उपाख्य 'विविक'.................................. ६६**
*– डॉ. नीलेश दीपकराव जोशी*

१३. **अध्ययन-अध्यापनात प्रसारमाध्यमांची उपयोगिता : एक सर्वेक्षणात्मक अभ्यास................................७१**
*- डॉ. तुषार मधुकर माळी*

१४. **व्यावसायिक फोटोग्राफर्सना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास ...७७**
*- मनोज रंधे, संदीप केदार*

१५. **जनसंपर्काचे लोकशाही शासन व्यवस्थेतील महत्त्व ..........८०**
*- श्री. सुभाष रूपचंद तळेले*

१६. **नवमाध्यमांचा महिलांवर प्रभाव आणि त्यांची सायबर सुरक्षा ..८३**
*- सौ अपूर्वा वाणी, प्रा. संदीप केदार*

१७. **The Relationship between Facebook and Whatsapp Appearance-Focused Activities and Body Image Concerns in Young Working Women ...89**
*- Dr. Sunita Anil Nemade*

१८. **Effect of Pessimistic and Optimistic Attitude on Personality Characteristics of interuniversity Football Players................................92**
*- Dr. Labhane C.P., Dr. Balaji D. Raut*

१९. **New Media and Youth ................................................98**
*- Dr. Priya Narendra Kurkure*

२०. **Studying Role of Mass Media Change the Face of Sport Development .................................104**
*- Dr. Shrikrishna H Belorkar, Prof. Anjali R Bannapure*

२१. **A Study of Teacher Effectiveness of Secondary Teachers and College Teachers in Jalgaon District. .111**
*- Dr. Ashok R. Rane*

२२. **The Effects of Social Media on Student Performance...................................................115**
*- Komal Himmat Patil*

२३. **The Role of Sports Media for Globalization of Sports...........................................119**
*- Dr. Kishor Pathak, Mrs. Harshada Patil, Dr. Vinay Pawar*

२४. **Objectification of Women in Bollywood Item Numbers...............................................................123**
- *Mrs. Anjali Biyani, Mr. Sandeep Kedar*

# दूरस्थ शिक्षणात प्रसारमाध्यमांची भूमिका

**किसन सुभाष पावरा,**
सहायक प्राध्यापक,
के. सी. ई. सोसायटीचे शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
जळगाव.

**सारांश**

दूरस्थ शिक्षणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे; त्याच बरोबर नवनवीन तंत्रज्ञानाची भर पडताना दिसत आहे. रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट, संगणक, मोबाइल व Social Media सारख्या आधुनिक व नवनवीन प्रसारमाध्यमांमधून औपचारिक व अनौपचारिकरीत्या दूरस्थ शिक्षण सहज उपलब्ध झालेले आहे.

**प्रस्तावना**

दूरस्थ शिक्षणाची सुरुवात भारतात १९८२ पासून झाली आहे. विकासाच्या माध्यमातून समाज सुदृढ आणि सामर्थ्यशाली होण्यासाठी अनौपचारिक शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. अनौपचारिक शिक्षण घडवून आणण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. कारण प्रसारमाध्यमे लोकांची मते आणि मनोवृत्ती बदलण्यात, त्यांचा वैचारिक दृष्टिकोन बदलण्यात मोलाचे कार्य करतात. शिक्षण क्षेत्रात दूरस्थ शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. कारण विद्यार्थ्याला प्रत्यक्ष महाविद्यालयात न जाता आपल्या सोयीनुसार व गरजेनुसार दूरस्थ शिक्षण व प्रसारमाध्यमांतून औपचारिक व अनौपचारिकरीत्या अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. थोडक्यात आज दूरस्थ शिक्षण घेण्यासाठी संधी वेगवेगळ्या तंत्रज्ञानाच्या साह्याने व प्रसारमाध्यमांमधून सहज उपलब्ध झालेली आहे.

**दूरस्थ शिक्षणात प्रसारमाध्यमांची भूमिका**

१. **रेडिओ :** आकाशवाणीवरून १९३६ पासून शैक्षणिक कार्यक्रम सुरू झाले. विद्यार्थ्यांना आनंदपूर्वक अध्ययन व नावीन्यपूर्ण शिक्षण रेडिओच्या माध्यमातून मिळत असते. शालेय विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी, पालकांसाठी महाविद्यालयातील व विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, आरोग्य, मूल्ये, स्वच्छता, पर्यावरण, रोजगार, व्यक्तिमत्त्व विकास, समुपदेशन इत्यादी विषयांवर काही

औपचारिक, तर काही अनौपचारिक शिक्षणाला पूरक भाग म्हणून आकाशवाणीवरून शैक्षणिक कार्यक्रमांचे प्रसारण केले जाते. नोव्हेंबर २००१ पासून इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने 'ज्ञानवाणी' ही वेगळी रेडिओ वाहिनी सुरू केलेली आहे. मुक्त विद्यापीठ फार मोठ्या संख्येने ध्वनिफिती दूरशिक्षण योजनेअंतर्गत आपल्या विद्यार्थ्यांसाठी निर्माण करीत असते. त्यांचे प्रसारणही या केंद्रांद्वारे केले जात असते. यावरूनच रेडिओची दूरस्थ शिक्षणातील भूमिका स्पष्ट होते.

२. **दूरदर्शन :** १५ सप्टेंबर १९५९ पासून दूरदर्शनच्या कार्यक्रमांची सुरुवात झाली. इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात बदल घडवून आणला आहे. १९६१ पासून शिक्षण क्षेत्रात दूरदर्शनचा उपयोग होऊ लागला. सध्याच्या परिस्थितीत शैक्षणिक प्रणालीमध्ये प्रभावी संप्रेषण माध्यम म्हणून सर्वसाधारणत: रेडिओ व दूरदर्शन दूरस्थ शिक्षणात लोकप्रिय आहेत. समाज सुदृढ व सामर्थ्यशाली होण्यासाठी अनौपचारिक शिक्षण अत्यंत आवश्यक असते. अनौपचारिक शिक्षण देण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. थोडक्यात दूरदर्शन हे कल्पकतेने उपयोगात आणलेले शिक्षण क्षेत्राच्या हातातील प्रभावी हत्यार किंवा साधन आहे यात दुमत असण्याचे कारण नाही. कारण अनेक विषयांचे शिक्षण मनोरंजकतेने, प्रभावीपणे व परिणामकारकपणे औपचारिक व अनौपचारिकरीत्या दूरदर्शनच्या माध्यमातून दिले जात आहे किंवा मिळत आहे.

३. **वर्तमानपत्रे :** वृत्तपत्रे हे सामाजिक जडण-घडणीचे महत्त्वाचे माध्यम आहे. समाजाच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेला प्रगतीशील बनविण्यामध्ये वृत्तपत्रांचे योगदान नाकारता येत नाही. किंबहुना त्यांच्या रेट्यामुळेच विकास पूर्णत्वास जातो. लोककल्याणाची भावना आणि परिवर्तनशील विचारांची पेरणी करत करत विचारशील समाज घडविणे हे वर्तमानपत्रांचे ध्येय असते. शिक्षणाच्या उद्दिष्टांचा विचार केला, तर समाजाला ज्ञानी, विचारी आणि प्रगल्भ करण्याचा विचार वर्तमानपत्रे पुढे नेत असतात. त्यामुळे लोकशिक्षणाच्या कामी वर्तमानपत्रे आणि प्रौढशिक्षण एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरतात. लोकमत जागृत करणे, संघटित करणे, कार्यप्रवण करणे ही कार्ये वृत्तपत्रे करीत असतात. अंधश्रद्धा आणि रूढी, परंपरांच्या

विळख्यात सापडलेल्या अज्ञानी निरक्षर समाजाला सजग करण्याचे कार्य मराठी वर्तमानपत्रांनी सुरुवातीपासूनच केले आहे. समाजात आधुनिक मूल्ये, मानवी विचार आणि सामाजिक अभिसरणाचे तत्त्वज्ञान पेरून प्रबोधनाची ज्योत पेटवण्याचे कार्य वृतपत्रे करीत आहेत. त्यामुळे परिवर्तनाचे प्रहरी म्हणून वर्तमानपत्रांकडे बघितले जाते.

४. **मासिके :** महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रसिद्ध केले जाणारे 'लोकराज्य' हे एक मासिक आहे. हे महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र आहे. महाराष्ट्र शासनामार्फत विविध विषयांवर होत असलेली कामे, सरकारची धोरणे, कला, संस्कृती, भाषा इत्यादी विषयांसंबंधीचे लोकराज्याचे विशेषांक निघतात. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या माध्यमातून हे मासिक प्रसिद्ध करण्यात येते. शिक्षण मंडळाकडून दरमहा 'शिक्षण संक्रमण' शैक्षणिक मासिक प्रकाशित केले जाते. या मासिकातून शिक्षण क्षेत्राशी संबंधित लेख, शाळांचे नावीन्यपूर्ण उपक्रम, दिनविशेषावर आधारित लेख व माहिती, पुनर्रचित अभ्यासक्रम, मूल्यमापन पद्धती, अभ्यासक्रमासंदर्भातील माहितीचा समावेश असतो. 'किशोर' हे बालभारतीच्या वतीने चालवण्यात येणारे मासिक आहे. १९७१ पासून आजवर हे मासिक प्रसिद्ध होत आहे. पुण्याचे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ हे मासिक प्रकाशित करते. मुलांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी, अभ्यासक्रमाबाहेरचे ज्ञान मिळावे, त्यांच्या संवेदनशील मनावर उत्तम मूल्यांचे संस्कार व्हावेत ही ह्या मासिकाची उद्दिष्टे आहेत.

५. **इंटरनेट :** आजचे जग हे तंत्रविज्ञानाचे जग आहे. जगात असा देश नाही जिथे तंत्रविज्ञानाचा वापर होत नाही. दूरस्थ शिक्षणाच्या स्थिरीकरणामध्ये तंत्रविज्ञानाची फार महत्त्वाची भूमिका आहे. बहुसंख्य विद्यार्थ्यांमध्ये दूरस्थ शिक्षणाच्या कार्यक्रमांच्या समुपदेशनासाठी इंटरनेट हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. इंटरनेटमुळे संगणक व मोबाइलसारख्या इलेक्ट्रॉनिक आणि Social Media सारख्या आधुनिक माध्यमांमुळे आज विविध महाविद्यालयांची व विद्यापीठातील माहिती एका click वर सहज उपलब्ध होते. उदा. माहिती पुस्तिका, प्रवेश प्रक्रिया व नियमावली, प्रवेश शुल्क,

Online पुस्तके Download करण्याची सुविधा, इतर सूचना, परीक्षेचे प्रवेशपत्र प्राप्त करण्यापासून तर काही विद्यापीठांमध्ये परीक्षा देण्याची प्रक्रियाही Online च आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने, Online यशवाणी वेब रेडिओ, तर सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठानेदेखील 'विद्यावाणी' हा Online वेब रेडिओ सुरू केला आहे. वेब रेडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घरी बसल्या बसलचया विविध विषयांचा अभ्यास पूर्ण करता येतो. थोडक्यात इंटरनेटच्या माध्यमातून दूरस्थ शिक्षणातील विविध विद्याशाखेतील शिक्षणक्रम पूर्ण करता येऊ शकतो. अशा प्रकारे दूरस्थ शिक्षणातील प्रसारमाध्यमांची भूमिका थोडक्यात स्पष्ट केलेली आहे.

**संदर्भ सूची**


१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ एम. ए. (शिक्षणशास्त्र) भाग -२ शिक्षणशास्त्र अभ्यासपत्रिका क्र.१० मुक्त आणि दूरस्थ अध्ययन.

२. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ एम. ए. (शिक्षणशास्त्र), दूरशिक्षणातील अनुदेशन अभिकल्प.

३. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, दृक-श्राव्य माध्यमे स्वरूप व कौशल्ये १. नभोवाणी.

४. प्रा. ह. ना. जगताप शैक्षणिक तंत्रज्ञान, नूतन प्रकाशन, पुणे.

५. https://www.google.com url?sa=tsource= webrct=jurl=http:// shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/97259/9/09š chapter%25203.pdfved=2ahUKEwiax82DyoXo-hWo7XMBHcyP BKUQFjDegQICRBusg=OvVaw3znD-UMY49wwCeyJyQj JK

६. http://shikshansankraman.msbshse.ac.in/

७. https://www.wikipedia.org/

शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे साधन मानले जाते. शिक्षणापासून समाज आणि राष्ट्राची योग्य जडण–घडण करता येते. प्रत्येक राष्ट्रात शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. शिक्षणासाठी योग्य सुविधा व सवलतीही दिल्या जातात. शिक्षण हे प्रत्येक स्तरापर्यंत पोहचविण्यासाठी शिष्यवृत्त्यादेखील दिल्या जातात. ज्यामुळे प्रत्येक समाजातील घटकाला शिक्षण घेता यावे व समाजाच्या मुख्य प्रवाहात येता यावे. म्हणूनच शिक्षण परिणामकारकरीतीने समाजापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी शिक्षकाने घेतली असून तो हे कार्य योग्य पद्धतीने करताना दिसून येतो.

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाही शासनप्रणालीमध्ये प्रसारमाध्यमांचे स्थान अनन्यसाधारण आहे. लोकशाहीला बळकटी देण्याचे व विकसित करण्याचे महत्त्वाचे कार्य प्रसारमाध्यमांना करावे लागते. प्रसारमाध्यमांचे इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित असे दोन्ही पर्याय आज सहज खुले असले तरी, अद्यापही मुद्रित माध्यमे हे अधिक विश्वासार्ह मानले जातात.

आता ई-बुक स्वरूपातही
अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...

- pejbook.com
- amazon.com
- Google Play Books
- atharvapublications.com

अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

ISBN 978-81-19118-12-0
₹ - 250/-